महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई —४००७०३.

परिपत्रक क्र.मुंविमं/आय.टी.ऑनलाईन परीक्षा—मार्च—२०२५/३०४/0433 दिनांक:9/12/२०२५

प्रति
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त I.T कनिष्ठ महाविद्यालये.
मुंबई,ठाणे,रायगड,पालघर.

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून फेब्रुवारी/मार्च—२०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस माहिती तंत्रज्ञान (आय.टी) विषय घेवून विद्यार्थी प्रविष्ठ झालेले असल्यास व क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी आय.टी विषयांस प्रविष्ठ केलेले असल्यास (६०पेक्षा अधिक विद्यार्थी प्रती तुकडी) अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा—३/४७०४ दि:०८/०८/१६ च्या पत्राप्रमाणे दंडाची रक्कम प्रती विद्यार्थी रूपये ५००/— तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना रूपये १०००/— या प्रमाणे मंडळाच्या खात्यात बॅंक ऑफ इंडियाच्या चलनाने दंडाची रक्कम भरण्यात यावी. **चलनाने रक्कम भरतांना चलनातील ६५ क्रमांकाचे हेड मध्ये आय.टी विषयाचा दंड असे नमूद करावे.**

दंड भरल्यानंतर मंडळ कार्यालयात **चलन** जमा करण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र	जिल्हा	वार	दिनांक
१.	मुंबई (३२) व मुंबई उपनगर (३३)	सोमवार	२४/०२/२०२५
२.	ठाणे (१६) व रायगड (१७)	मंगळवार	२५/०२/२०२५
३.	मुंबई (३१) व पालघर (१८)	गुरूवार	२७/०२/२०२५

कनिष्ठ महाविद्यालयाचे लेटर हेड व चलनासोबत मंडळात जमा करावयाची माहिती पुढीलप्रमाणे.
१) आय.टी विषयासाठी देण्यात आलेल्या मंडळ मान्यतेच्या पत्राची छांयाकित प्रत.
२) अतिरिक्त तुकडी मान्यतेच्या पत्राची छांयांकित प्रत.
३) या परिपत्रकासोबत जोडलेले परिशिष्ट 'अ'

महत्वाची सूचना :—
कनिष्ठ महाविद्यालयांत विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त प्रविष्ठ असले किंवा नसले तरी सदर माहिती मंडळात जमा करणे, सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांना बंधनकारक आहे. जे कनिष्ठ महाविद्यालये निर्धारित तारखांना उपरोक्त माहिती जमा करणार नाही त्यांचे आय.टी ऑनलाईन परीक्षेसाठी Login होणार नाही याची नोंद घ्यावी. विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास/विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे - पवार)
विभागीय सचिव (प्र.)
मुंबई विभागीय मंडळ
वाशी,नवी मुंबई—४००७०३.

Scanned with ACE Scanner

परिशिष्ट 'अ'

टिप – फेब्रुवारी/मार्च २०२५ माहिती तंत्रज्ञान (आय.टी) विषयाचे गोपनीय साहित्य स्विकारतांना खालील माहिती कनिष्ठ महाविद्यालयांच्या लेटरहेडवर विषय मान्यतेच्या साक्षांकित प्रतीसह मंडळात जमा करणे आवश्यक आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव–

सांकेतांक क्रमांक

आय.टी विषय मान्यता असलेल्या तुकडयांची संख्या				फेब्रु/मार्च २०२५ साठी आय.टी. विषयास प्रविष्ठ विद्यार्थी संख्या				आय.टी विषयांस मान्यता नसतांना अतिरिक्त प्रविष्ठ विद्यार्थी संख्या			
कला	वाणिज्य	विज्ञान	संयुक्त	कला	वाणिज्य	विज्ञान	संयुक्त	कला	वाणिज्य	विज्ञान	संयुक्त

मुख्याध्यापक/प्राचार्याची स्वाक्षरी व
कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

Mob no –

Scanned with ACE Scanner